जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2024
लोकमत

# जीवरसायनशास्त्र, 'मराठी' विभाग उत्कृष्ट

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त देण्यात येणारा उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार जीवरसायनशास्त्र व मराठी अधिविभागाला शनिवारी जाहीर केला. दहा लाख रुपये, प्रशस्तीपत्र व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. उद्या, सोमवारी विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त राजर्षी शाहू सभागृहात आयोजित कार्यक्रमात कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2024
पुढारी

# मराठी, जीवरसायनशास्त्र'ला उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार जाहीर

## ● विद्यापीठाच्या वर्धापनदिनी वितरण; दहा लाख रुपये पुरस्काराचे स्वरूप



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४ चा अभियांत्रिकी अधिविभागातून जीवरसायनशास्त्र विभाग, तर अन्य अधिविभागामधून मराठी अधिविभागाची उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या वर्धापनदिनी (दि. १८) नोव्हेंबर रोजी विज्ञान व अभियांत्रिकी विभागांमधून एका अधिविभागास व अन्य विभागांमधून एका अधिविभागास उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार देण्यात येतो. दहा लाख रुपये रोख, प्रशस्तिपत्र व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यावर्षी संबंधित दोन अधिविभागांची निवड करण्यात आली आहे. शिवाजी विद्यापीठ वर्धापन दिनी (दि. १८) सकाळी ८.४५ वाजता राजर्षी शाहू सभागृह येथे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखालील कार्यक्रमात पुरस्कार वितरण होईल. अभिविभागाचे प्रमुख व त्यांच्या सहकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2024
पुढारी

# विद्यापीठात बिरसा मुंडा यांची जयंती साजरी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रामार्फत बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली.

कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते प्रशासकीय भवन इमारतीमध्ये बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी इतिहास अधिविभाग प्रमुख. डॉ. अवनिश पाटील, सहा. प्राध्यापक, डॉ. दत्तात्रय मचाले, प्रशासकीय विभागातील अधिकारी, अध्ययन केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2024
पुढारी

# विद्यार्थी सुविधा केंद्र तीन दिवस बंद

**कोल्हापूर :** भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार विद्यार्थी सुविधा केंद्रातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांची विधानसभा निवडणूक कामासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी नियुक्ती केली आहे. त्यामुळे विद्यार्थी सुविधा केंद्राचे कामकाज तीन दिवस बंद राहणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी परिपत्रकाद्वारे कळविले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2024
पुढारी

# विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागातर्फे मतदान जनजागृती अभियान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागामार्फत विधानसभा निवडणूक-२०२४ निमित्त मतदान जनजागृती अभियान राबविण्यात आले. अभियानांतर्गत मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली.

रॅलीचा प्रारंभ तंत्रज्ञान अधिविभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. पी. डी. पाटील यांच्या हस्ते झाला. रॅलीमध्ये विभागातील विद्यार्थी, शिक्षकांनी सहभाग नोंदविला. मतदानाबाबत जनजागृती व्हावी, मतदानाचे प्रमाण वाढावे, यासाठी अभियान राबविण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजन शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. एम. चौगले, तंत्रज्ञान अधिविभाग राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अरविंद मडावी व प्रा. डॉ. प्रशांत पाटील यांनी केले. यावेळी प्रा. उदय पाटील, प्रा. डॉ. इराण्णा उडचान, प्रा. डॉ. दौलत नांगरे, प्रा. अमर डूम, प्रा. पूजा माने, प्रा. वैशाली मोहिते, प्रा. निकिता दिंडे, प्रा. डॉ.जमीर बागवान उपस्थित होते.

17 NOV 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निवडणूक निरीक्षक अली यांनी मतदान जनजागृतीचा घेतला आढावा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

निवडणूक निरीक्षक (सामान्य) मीर तारीक अली यांनी शनिवारी शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागास भेट दिली. यावेळी त्यांनी विद्यापीठाच्या माध्यमातून निवडणूक साक्षरता व मतदान जनजागृतीबाबत करण्यात येत असलेल्या कामाचा आढावा घेतला.

निवडणूक प्रक्रियेत राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहभागाबद्दल अली यांनी समाधान व्यक्त केले. त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आयक्यूएसी संचालक डॉ. सागर रेडेकर आणि वाणिज्य विभाग अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्याशी विद्यापीठाच्या माध्यमातून सुरू असलेल्या संशोधन, विस्तार कार्य आणि शेतीविषयक विविध बाबींवर त्यांनी चर्चा करून मौलिक सूचना केल्या. विद्यापीठाच्या जलस्वयंपूर्णतिबाबत तसेच ऊर्जा स्वयंपूर्णतिबाबतही त्यांनी समाधान व्यक्त करून भविष्यात आणखी सुधारणा होण्याच्या दृष्टीने सूचना केल्या.

एनएसएस विभागाचे संचालक डॉ. टी. एम. चौगले यांनी विद्यापीठाच्या माध्यमातून कोल्हापूर, सांगली आणि साताऱ्यामध्ये होत असलेले निवडणूक साक्षरतेचे काम आणि निवडणुकीसाठी प्रत्येक महाविद्यालयात स्थापन झालेल्या निवडणूक साक्षरता मंचाबाबत माहिती दिली. मतदान प्रक्रिया सुलभ होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी पोलिस मित्र म्हणून निवडणूक प्रक्रियेत सहभागी आहेत तसेच प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी प्रत्येक बूथवर सहायक म्हणून कार्यरत राहणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2024
पुढारी

# भूमिका पाटीलची राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत व जिल्हा क्रीडा कार्यालय, छत्रपती संभाजीनगर आयोजित छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत १९ वर्षांखालील गटामध्ये विवेकानंद महाविद्यालयातील भूमिका पाटीलने सुवर्णपदक मिळविले. राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेसाठी तिची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे व आर.बी.जोग, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2024
पुण्यनगरी

# विद्यार्थी सुविधा केंद्रातील कामकाज तीन दिवस बंद

**कोल्हापूर :** विधानसभा निवडणुकीसाठी बुधवार, दि. २० रोजी मतदान होणार आहे. या मतदानाच्या कामकाजासाठी शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रातील अधिकारी व कर्मचारी प्रतिनियुक्तीवर जाणार आहेत. त्यामुळे दि. १९ ते २१ नोव्हेंबर या कालावधीमध्ये विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्राचे कामकाज बंद राहणार आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे देण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठात बिरसा मुंडा यांची जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रामार्फत शुक्रवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते प्रशासकीय भवन इमारतीमध्ये 'बिरसा मुंडा' यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील, सहा. प्राध्यापक डॉ. दत्तात्रय मचाले, प्रशासकीय विभागातील अधिकारी, अध्ययन केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2024
पुण्यनगरी

# तंत्रज्ञान अधिविभागामार्फत मतदान जनजागृती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामार्फत विधानसभा निवडणूकनिमित्त मतदान जनजागृती अभियान राबवण्यात आले. मतदानाबाबत जनजागृती व्हावी, मतदानाचे प्रमाण वाढावे यासाठी सदर अभियान घेण्यात आले. मतदारांनी मतदानाचा पवित्र हक्क बजावावा, असे आवाहन विद्यार्थ्यांनी रॅलीच्या माध्यमातून केले. अभियानासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. या अभियानांतर्गत मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीचा प्रारंभ प्र. संचालक प्रा. डॉ. पी. डी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. रॅलीमध्ये विभागातील विद्यार्थी व शिक्षकांनी भाग घेतला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2024
सकाळ

# शिवाजी विद्यापीठात बिरसा मुंडा यांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रातर्फे बिरसा मुंडा यांची जयंती साजरी झाली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते प्रशासकीय भवन इमारतीत मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील, सहायक प्राध्यापक डॉ. दत्तात्रय मचाले, प्रशासकीय विभागातील कर्मचारी, अध्ययन केंद्रातील कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2024
सकाळ



# विद्यापीठ सुविधा केंद्राचे कामकाज १९ ते २१ बंद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी सुविधा केंद्राचे कामकाज १९ ते २१ नोव्हेंबर दरम्यान बंद राहणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या कामकाजासाठी केंद्रातील सर्व अधिकारी व प्रशासकीय कर्मचारी प्रतिनियुक्तीवर जाणार आहेत. याची विद्यार्थी, पालक यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2024
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातर्फे आयोजित मतदान जनजागृती अभियानात सहभागी विद्यार्थी.

# तंत्रज्ञान अधिविभागातर्फे मतदान जनजागृती

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातर्फे विधानसभा निवडणूक २०२४ निमित्त मतदान जनजागृती अभियान राबविण्यात आले.

अभियानाअंतर्गत मतदान जनजागृती फेरी काढण्यात आली. प्रभारी संचालक प्रा. डॉ. पी. डी. पाटील यांच्या हस्ते फेरीची सुरुवात झाली.

मतदानाबाबत जनजागृती व्हावी, मतदानाचे प्रमाण वाढावे, हा अभियानाचा हेतू होता. राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. एम. चौगले, तंत्रज्ञान अधिविभाग राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अरविंद मडावी, प्रा. डॉ. प्रशांत पाटील संयोजन केले. या प्रसंगी प्रा. उदय पाटील, प्रा. डॉ. इराण्णा उडचान, प्रा. डॉ. दौलत नांगरे, प्रा. अमर डुम, प्रा. पूजा माने, प्रा. वैशाली मोहिते, प्रा. निकिता दिंडे, प्रा. डॉ. जमीर बागवान उपस्थित होते.